REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# पथनाट्य : सामाजिक प्रबोधनाचे साधनरूप

राजशेखर शिंदे
सहाय्यक प्राध्यापक ( निवड श्रेणी )
दयानंद कॉलेज, सोलापूर



## प्रस्तावना :

महाराष्ट्रामध्ये नाटक या वाङ्मयप्रकाराच्याव्दारे सामाजिक प्रबोधन फार मोठ्याप्रमाणात झाले आहे. आधुनिक काळात महाराष्ट्रभूमी प्रबोधनाची भूमी म्हणून ओळखली जाते. नाटकाव्दारे जरठ–बाल विवाह, हुंडा प्रथाबंदी, दारु व्यसन बंदी गरीब श्रीमंत दरी अशा अनेक कुप्रथांवर नाट्यप्रयोगातून प्रकाश टाकून समाजमनाचे परिवर्तन घडविण्यात आले आहे. जरढबाला विवाहबंदी, दारु बंदी, हुंडा बंदी, जमीनदारबंदी आशा गोष्टींविरुध्द नाटकामधून आवाज उठविण्यात आलेला आहे. गोविंद बल्लाळ, देवल, राम गणेश गडकरी ही नावे आपल्या दृष्टीसमोर चटकन येतात. स्वातंत्र्योत्तर काळात पथनाट्य या प्रकाराने समाज प्रबोधनाचे मोठे काम केलेले आहे. मागील दीड–दोन दशकापासून सूशिक्षित पिढीत तर पथनाट्य प्रकाराने मोठे स्थान निर्माण केले आहे. म्हणून प्रस्तुत निबंधात पथनाट्याचे स्वरुप, त्याच्या सामाजिक प्रबोधनाचे स्वरुप पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

## पथनाट्याचा पूर्वेतिहास :

पथनाट्य सर्वत्र आढळणारा नाट्याविष्कार आहे. 1963 साली न्यूयॉर्कमध्ये 'ब्रेड अँड पपेट थिएटर 'ची स्थापना झाली. या थिएटरद्वारे जगभर पथनाट्याचे प्रयोग होऊ लागले. व्हिएतनाम युध्दाविरोधी वातावरणनिर्मितीसाठी पथनाट्याचा वापर केला गेला, जसे सांगतात ? बंगालमध्ये बादल सरकार, उत्पल दत्त, सफदर हाशमी अशा कलावतांनी पथनाट्याचे प्रयोग उपयोजिले आहेत. जनजागृती घडवून आणणे ही पथनाट्याची प्राणभूत प्रेरणा आहे. दलित रंगभूमीत समतेची चळवळ उभी करण्यासाठी पथनाट्याची मदत झाली आहे.

पंरपरेने आपल्याकडे काही विधी नाट्ये केली जातात. पथनाट्याची मुळे त्यामुळे सापडतात जागरण गोंधळ, वाघ्या–मुरळी,वासुदेव, भराडी, रायंदर, बहुरुपी इत्यादी लोक पथनाट्याला जवळचेच नाट्य चालत असतात. गोंधळ बाह्यामुरली ही विधीनाट्ये सादर करतात; पण ते पथनाट्याला काहीसे जवळ आहे असेच म्हणता येते. . कारण ही विधीनाट्ये रात्रभर रंगतात! पथनाट्याला तर विधीनाट्याच्या पूजेला लागणारा वेळही पुरेसा असतो.

## पथनाट्याचे स्वरुप :

नाटक, सिनेमा, एकांकिका या सर्वांहून पथनाट्याचे सादरीकरण निराळे असते. त्याचे रुप, स्वरुप नाटक–सिनेमाकडून अत्यंत साधे असते. पथनाट्याच्या सादरीकरणाला कोणताही खर्च नसतो. पथ म्हणजे रस्ता, रस्त्यावर केले जाणारे नाट्य ते पथनाट्य रंगमंच मुक्त अशी ही नाटके असतात. रस्ता, चौक, कोपरा, चारलोक मिळतील अशा ठिकाणी पथनाट्य करता येते. फिरना, दलता, रंगमंच, लाइटिंग किंवा उढावदार अशा कोणत्याही तंत्राची, करामतीची पथ नाट्याला आवश्यकता नसते. नाट्याच्या सादरीकरण, हालचालीसाठी थोडीशी जागा अपेक्षित असते. पंचवीस–तीस मिनिटे बघे उभे राहू शकतात.

पथनाट्याला आंगिक आणि वाचिक अभिनय गुणांची आवश्यकता असते. अभिनयात सूक्ष्म विभ्रमंचीही तशी फारशी आवश्यकता नसते. एखादया पात्राच्या ठिकाणी ती अंगभूत गुणवत्ता असेल तर अधिकच चांगले, पण नाही म्हणून उणेपणा जाणवत नाही. सूक्ष्म विभ्रमांच्या दर्शनासाठी लागणारा नाट्यवकाश नसतोच. म्हणून अस्सल

आंगिक नि वाचिक अभिनय पुरेसे असते. आंगिक अभिनय हे विभ्रमांहून निराळे असते. तो चटकन जाणवणारा गुण असतो. विभ्रम हे अधिकचे गुणविशेष असतात. पात्राला आणखीनच उठावदारपणा येण्यासाठी वेशभूषा केशभुषा यांची सुध्दा तशी आवश्यकता नसते. पथनाट्य सादरकर्त्या संचाने आपली एकरंग वा एकदंगी वेशभुषा ठरविलेली असते. आवश्यकतेपुरते एखादा बदल प्रसंगपरत्वे असतो. पथनाट्य रंगमंच मुक्त जसे तसे ते नेपट्य आणि यासारख्या रंगमंचीय तांत्रिक बाजूंपासून ही मुक्ता असते.

चौकोन, थोड्याशा जागेत आणि पाचपन्नास ते शे–सव्वाशे बघ्यांसमोर पथनाट्य घडत असते. अशावेळी ध्वनिक्षेपाची सुध्दा आवश्यकता नसते. हृदयाचा ठाव घेणारा खडा आवाज पथनाट्यात असतो. अत्यंत दळवे, कोमल, नाजूक आणि तितकेच रौद्र, रुप पथनाट्यात दाखविले जाते.

## पात्र संयोजन

मराठीतील पथनाट्याच्या पात्रसंयोजनाबाबतीत विचार केल्यास पथनाट्य सूत्रधारकाकडून मांडले जाणारे नाट्य आहे, जसे दिसून येते. सूत्रधार महत्वाचा असतो. कन्नडमध्ये 'दोड्‌डाटा' नावाचा महाखेळ–महानाट्य असते; पण या महानाट्यात दोड्‌डाटात आणि पथनाट्यात एक साम्य असते. ते साम्य म्हणजे सूत्रधार होय. दोड्‌डाटात सूत्रधाराला 'सारथी' म्हणतात. नाटकाचे सारथ्य तोच करतो. पात्राला मंचावर येण्याचे कारण सारथी विचारतो, प्रश्नांची सरबत्ती करतो आणि त्या पात्राचे निवेदन करतो. दोड्‌डाटा रंगतो तो कुशल, सदभिरुची संपन्न सारथ्यामुळे हेच साम्य पथनाट्याच्या सूत्रधारामध्ये आहे. कन्नडमध्ये 'बैलाटा' (बैला म्हणजे उघडे, मोकळे रान/जागा, आटा=नाटक) असतो. हा बैलाटा म्हणजेच पथनाट्य पथनाट्यात आणि बैलाटात सूत्रधारातील फरक. पथनाट्यात सूत्रधार असतो. सुत्रधारामुळे 'पथनाट्याला' बंदिस्त रुप येते. तो नाट्यविषयाचे निवेदन करतो. केवळ तो निवेदन करुन थांबत नसतो तर नाट्यविषयाचे विवेचनही अगदी थोडक्यात करतो. 'बघितलंत मंडळी!' असे असे आवाहानात्क उच्चार करुन प्रसंगावर भाष्य करतो. पथनाट्यात काही नाट्यप्रसंग असतात. या प्रसंगावर सूत्रधार टिपण्णी करतो. त्यामुळे पात्राच्या अंगात मनात अंगार फुलते. पात्राच्या दृष्टीने सूत्रधार हे उद्दिपन–विभाव असते. पथनाट्यातील सूत्रधार हे डोळस पात्र असते. सूत्रधारच जनसमुहाच्या मनात त्वेशाचे आणि जन्यायाविरुध्द विद्रोहाचे बीज पेरतो. नाट्याशयाचा धागा पुढे नेणारा एवढेच सूत्रधाराचे काम नसते, प्रसंगाची वातावरणनिर्मिती करत नाट्यनुकुलता निर्माण करणारा, पात्राच्या नाट्यरंग धारणाला आलंबरु ठरणारा, प्रसंगामधील अभिव्यक्तीला भाषानुकुलता निर्माण करणारा, निवेदनातून नाट्यरंग भरणारा, आणि बघ्या–प्रेक्षकांना आपल्या नाट्यात ओढून घेणारा पथनाट्यातील सूत्रधार असतो. त्याचे निवेदन जितके प्रभावी असेल, सुस्पष्ट आणि गंभीर असेल तितकेच पुढील प्रसंग प्रत्ययकारी प्रभावी होतात.

पथनाट्य दहा–एक पात्रांनी मिळून मांडले जाते. पण पात्रसंयोजन रंगमंचीय नाटकाप्रमाणे बंदीस्त नसते. पथनाट्य पात्रसंयोजन अंतरगत वेगवान लय असते. सुट्या प्रसंगातून एक अंतःसंगतीत पात्रसंयोजनात एक लयसंगती साधली जाते. एका प्रसंगात एकेक, दोन–दोन,चार–पाच आणि पूर्व संच अशी पात्रसंयोजना असते. कारण पथनाट्य समाजाचे असते. ते नाट्य समुहाचे असते ; कारण ते समुहातच घडते. म्हणून पथनाट्य समूह मनाचे असते. त्याला 'लोकमनावर' संस्कार करायचे असतात.

पथनाट्यात काम करणारे अभिनय करणारे पात्र–वास्तवात कार्यकर्ता असणारे वा ती मानसिकता असणारे असते. म्हणून जिवंत अभिनय बघायला मिळते.

## पथनाट्याची भाषा निसंवाद :

पथनाट्य भाषेच्याबाबतीत सावध असते. पथनाट्याची संहिता अशी नसते. नाटककाराला भाषेचा फुलोराही फलवायचा नसतो. पथनाट्यात भाषिक फुलोरा फुलला की नाट्यात संदिग्धता आणि कृत्रिमता येते. हे नाटककाराला टाळायचे असते. भाषेचे सौंदर्य आलंकारिकता टाळून बोलीचा डौल मात्र आटोकाट सांभाळाला जातो. समोर सामान्य जनसमूह असतो. त्यांना कळेल अशी भाषा असते. त्या बोलीमुळे विषयाची आवाहकता नि धग टिकून राहते.

पथनाट्याची संहिता उत्स्फूर्त असते. लिखितस्वरुपाची संहिता नसते. असली तरी टाचणवजा असते. तीमध्ये दृश्ये दिलेली असतात. पथनाट्याच्या भाषेबाबतही उत्स्फूर्तता असते. उत्स्फूर्ततेपोटी अभिनित प्रसंगाची नितांत कड म्हणून उत्स्फूर्त बोलीतून पात्र बोलते. शब्द बंबाळपणा त्या पात्राला रुचत नाही ; नाटककाराला ते

अपेक्षित नसते. त्याला समजासमोर समाजातीलच ज्वलंत प्रश्न त्याला मांडायचे असतात. बोली आलंकारिक; लफ्फेबाज, भरजी होणार नाही, इकडे लक्ष दिलेले असते. अशा प्रभावकारी, प्रत्ययकारी भाषेत पथनाट्ये श्री प्रभाकर दुपारे यांनी दलित चळवळीत, जलशात केली आहेत[2]

पथनाट्यात संवादफेकीला महत्व आहे. हे संवाद संहितेप्रमाणेच उत्स्फूर्त असतात. दिग्दर्शक विषय समजावून सांगितल्यानंतर त्याच्याकडील टाचणवजा टिपणात, त्याच्या समाजानुसार आणि पात्राच्या प्रसंगौचित्यनुसार संवादफेक होते. खरे तर संवादाच्यावेळी म्हणजे तालिमीमध्येच पथनाट्याची संहिता आकारास येते. अर्थात हे संवाद आणि संहिता लवचिक असतात. 'बधितलत मंडळी' बघा बघा होय सायण, होय बा, काऽऽय, कोऽऽण, असे पालुपद मधे मधे लावलेले असते ; पण अलीकडे पथनाट्यात ही पालुपदे गेली आहेत. तिथे हलकिशी एखादी लय काढली जाते, झंकार दिला जातो.

### सांगितिक साथ :

पथनाट्य थेट विषयाला भिडते. प्रसंगाला उटावदारपणा आणण्याचा गोष्टींचा संकोच केला जातो. जिथे आवश्यकताच आहे तिथेच एखाद्या वाघाची तेवढ्यापुरती साथ असते. ती वाघे म्हणजे संबळ, हलगी, ढोल, किंवा अगदीच थाळी अशी वाद्ये वातावरणनिर्मितीसाठी असतात. अभंग, ओवी, गौळण, लावणी, पोवाडा यांमधील एखादी लोकलय उपयोजिली जाते. सुगम संगीताचाही उपयोग असतो. पण हे सारे तुकड्या तुकड्यानेच, वेळच नसतो. हलगीची थाप हे पथनाट्याचे मुख्य संगीत, पूर्ण गाणं, पूर्ण लय–संगीत, धून असे म्हणून काही त्यामध्ये नसते. जे असते ते केवळ साथ, उठाव, ठसविण्याकरिता म्हणून.

### पथनाट्य आणि प्रबोधन :

नाटकाच्याव्दारे मराठी समाजात प्रबोधन होत आले आहे, हे सर्वश्रुत आहे. आज विज्ञानाचे युग आहे. परग्रहावरील वास्तव्याची भाषा केली जात आहे, यंत्रमानवाला आज्ञा देऊन कामे करुन घेतली आहेत. अशा काळात प्रबोधनाची आवश्यकता आहे का, अशी शंका उपस्थित होते. प्रबोधन कोढे होते, कोणाचे होते, कोणासाठी, कशासाठी होते ? याचे उत्तर सरळ आहे. माणसांकडून, माणसांचे पण एका माणसाचे मतपरिवर्तन होते. माणसांमाणसांचा समाज बनतो. प्रबोधन काळात किंवा प्रबोधन असे म्हटले जाते तेव्हा त्यामध्ये समग्र समाज अपेक्षित असतो. व्यक्ती व्यक्तींचा समूह, समूह समूहांचा समाज असतो. समाजात पुन्हा कोणतीही एक अशी आचरण पध्दती ; धर्म नसतो. अशा वेगवेगळ्या जात,धर्मांचा मिळून एक संघ असा समाज झालेला असतो. वेगवेगळ्या जाती–धर्मांच्या वेगवेगळ्या आचरण पध्दती असतात. काही अशी समजुती,धारणा असतात. प्रत्येक व्यक्तीची आकलन क्षमता, आकलन पातळी निराळी असते. त्यामधून अनैसर्गिक, समजुती, चुकीच्या धारणा निर्माण होतात. व्यक्तीच्या प्रभावातून त्या समजुती, धारणा समाजात रुढ होतात. याला विकसित आणि अविकसित असे निश्चित नाही. अविकसित काळात प्रबोधन करणारे हे बुध्दिवादी,शास्त्रीय दृष्टीचे होते ; आणि विकसितकाळात प्रबोधनाची आवश्यकता भासते म्हणजे अज्ञानी, अंधश्रध्द लोक आहेतच. समाज सर्वस्वी बुध्दिवादी आणि सर्वस्वी अंधश्रध्द किंवा अबुध्दिवादी नसतो. म्हणून प्रबोधनाची आवश्यकता कोणत्याही काळात असते. कारण मानवी समाजात परंपराचे बहन होते. बहनात ब–या–वाईट दोन्ही परंपरा असतात. तो तो काळात आपल्यामधील अनिष्ट गोष्ट नष्ट करण्याच्या त्या विषयी जागृती करण्याच्या अथम प्रयत्नात असतो. आजच्या काळात पथनाट्य जवळचे वाटत असल्याचे दिसून येत आहे.

पथनाट्य विशेषतः महाविद्यालयात शिकत असलेल्या तरुणवर्गात प्रिय झाले आहे. पथनाट्याला लागणारा कमी वेळ, खर्चाची तजविज न करावी लागणे, आणि विषय थोडक्यात पण प्रभावी ही कारणे लोकप्रियते मागे आहेत. पथनाट्याच्या विषय समकालातील ज्वलंन प्रश्न असतो. प्रबोधन हे समकालातील अनिष्ट गोष्टींविषयीच होते. त्यांच्या कालात होणा–या अनिष्ट गोष्टी, प्रथा, रुढी जवळून पाहिल्याने वार्तांकने वाचल्याने, दूरदर्शनवरुन ती थरारक दृश्ये पाहिल्याने समस्यायाची धग त्यांना कळलेली असते. पथनाट्य करणा–याला ती प्रत्ययकरिता भिडते, पाहणा–याला त्यामागील कारणे कळतात. शिवाय या दोन्ही गोष्टींसाठी विशेष वेळ द्यावा लागत नाही. हे तरुणांना विशेष करुन भावते.

### शासकीय आदेभाान्वये पथनाट्ये :

कल्याणकारी राज्य आपल्या राज्याचे कल्याण करण्यावर भर देते. उद्याची पिढी सुजाण करण्यासाठी कोणतेही शासनव्यवस्था शाळा,महाविद्यालये; विद्यापीठ यांच्यावर लक्ष केंद्रित करते. शासन अशा शैक्षणिक संस्थांना वेगवेगळ्या क्रीडा महोत्सव, उत्सव, स्पर्धा, युवा महोत्सव प्रसंग काही समस्यांना तोंड फोडण्याच्या प्रयत्नात असते, जाणीव–जागृती निर्माण करण्याच्या प्रयत्न व्हावा, याची दक्षता शासन घेत असते. त्याकरिता दरवर्षी भरणा–या अशा महोत्सव–उत्सवांकरिता प्रदर्शनार्थ, सादरीकरणार्थ शासन विषय (Theam) देते. विद्यापीठीय युवा महोत्सवात केवळ कलागुणांची अभिव्यक्ती अविष्कार होतो. मागील दोन दशकापाासून सामान्यतः विषय दिलेले असतात. हे विषय पथनाट्य, प्रभात फेरीसाठीचे असते. समाजापर्यंत ते विषय पोहोचवते, असे धोरण त्या मागे असते. सामाजिक वनीकरण,जल साक्षरता, प्रदूषण, प्लॅस्टीक मुक्ती पाणी अडवा–पाणी जिरवा, लेक वाढवा–लेकी शिवा,स्त्रीभूण हत्या, अंधश्रध्दा, अनाथांना नाथ, पाझर, माया, पर्यावरण, कौटुंबिक हिंसा,एड्स, बालविवाह, पोलिओ डोस, अशा अनेक विषयातून जनजागृती केली जाते. दगणदारी मुक्त गाव' या संकल्पनेला घेऊन बरीच जागृती झालेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील तीन प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी पथनाट्य अत्यंत लोकप्रिय झाले होते. मागील दशकात (सन 2003 ते 12 पर्यंत) त्यांनी महाराष्ट्रभर ठीक–ठिकाणी पथनाट्य सादर केले आहेत. अगदी प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती असताना दिल्ली येथे राष्ट्रपतींसमोरही ही 'हागणदारी' मुक्त गाव' पथनाट्य सादर केले आहे.

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील युवा महोत्सवात प्रा हनुमंत मते, डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ रवींद्र रणवरे, डॉ वीरभद्रदंडे यांनी दिग्दर्शित केलेली पथनाट्ये सर्वसामान्य लोकांना आकृष्ट करुन घेतले आहेत. विषय असेच समस्याप्रधान, समकालीन प्रश्नांचे;पण त्यामधून विद्यार्थ्यांचे, सर्वसामान्यांचे प्रबोधन निश्चित झालेले असणार.

सारांश, सर्वसामान्यांपर्यंत भाषेच्या सहजतेमुळे, अभिनेत्याच्या तळमळ कळकळीमुळे पथनाट्याचा विषय सामान्य लोकांपर्यंत पोचतो. विषयाचा गाभा आंतर्बाह्य रीतीने सामाजिक प्रबोधनाचाच असतो. इष्टानिष्ट गोष्टी, समजूती, रुढी, धारणा, प्रथा, असहिष्णुता आदीविषयी सदसदविवेक जागृती पथनाट्याने होते. पथनाट्य असूनही, आणि रंगमंचाला काट मारुनही पथनाट्य मांडणाऱ्या अस्सल अभिनय गुणवत्ता असते. पथनाट्याची एखादी दुसरी तालीम, लागणारा कमी वेळ, हेतूंची परिणामकारकता अशा अनेकविध कारणांमुळे पथनाट्य लोकप्रिय होत आहेत. त्या योगे प्रबोधन साधले जात आहे.[4]

पथनाट्याच्या अभ्यासामधील मोठी अडचण अशी, की पथनाट्य संहिता उपलब्ध होत नाहीत. स्पर्धात्मिकतेमुळे व संशयामुळे असे लेखक वा दिग्दर्शक आपल्याकडील संहिता अभ्यासकाला सुर्पूद करीत नाहीत. यावर एक उपाय सुचविता येईल, की वेगवेगळ्या विद्यापीठ पातळीवर आणि युवा महोत्सव साजरे होतात तेव्हा त्या त्या विद्यापीठाकरिता सादरकर्त्यांकडून संहिता जमा करुन घ्याव्यात आणि त्या विद्यापीठ ग्रंथालयात बांधीवरुवात ठेवाव्यातत्र म्हणजे त्या संहिता अभ्यासकांता उपलब्ध होतील.

### संदर्भ :

1.वाड्मयीन संज्ञा–संकल्पना कोशः संपा प्रभा गणोरकर व इतर ग. रा. भटकळ फांऊडेशन मुंबई, 2002.
2.दलित रंगभूमी : संपा. भालचंद्र फडवे. सुरेश एजन्सी, पुणे 1982